दैनिक

# महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990

लातूर वर्ष ३ रे अंक ३०७ वा शनिवार दि.१८ मे २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.







# बीड लोकसभा : जरांगे फॅक्टर चालणार की पंकजा मुंडेंचा करिष्मा

आष्टी, लोकसभा निवडणुसाठी बीड मतदारसंघात ७० टक्क्यांपेक्षा अधिक मतदान झाले. गेल्या वेळेपेक्षा यात ४ टक्क्यांची वाढ झाली आहे. या वाढीला मराठा विरुद्ध ओबीसी संघर्षाची किनार असल्याचे बोलले जात आहे. दोन्ही समाजांनी मोठ्या प्रमाणात मतदान केल्याचे चित्र आहे. ही वाढीव टक्केवारी कोणाला फायदेशीर ठरणार, याची आकडेमोड दोन्ही उमेदवारांकडून करण्यात येत आहे. तर पंकजा मुंडे आपला करिष्मा दाखवणार, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.बीड मतदारसंघात पंकजा मुंडेंचा करिष्मा चालणार का? बीड मतदारसंघात ७० टक्क्यांपेक्षा अधिक मतदान मराठा विरुद्ध ओबीसी संघर्षाची किनार दोन्ही समाजांनी मोठ्या प्रमाणात मतदान केल्याचे चित्र शरद पवारांकडून मराठा आंदोलनाचे नेते मनोज जरांगेंचा भाषणात उल्लेख प्रचाराच्या अखेरच्या दिवशी महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे यांच्या प्रचारसभेत राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार यांनी मराठा आंदोलनाचे नेते मनोज जरांगे यांचे नाव घेतले होते. त्यातूनही सुचक संदेश गेल्याचे बोलले जात आहे. मराठा आरक्षणाच्या आंदोलनाचे केंद्रबिंदू असलेल्या जालना जिल्ह्यातही गत वेळच्या तुलनेत चार टक्के मतदान वाढले आहे. गेल्या वेळी ६४ टक्के मतदान झाले होते. यंदा ६८ टक्क्यांपेक्षा अधिक मतदान झाले. या दोन जिल्ह्यांच्या तुलनेत छत्रपती संभाजी नगरमध्ये फारसा फरक पडलेला नाही.मतदानाच्या टक्केवारीला जातीय संघर्षाची झालर लोकसभा निवडणुकीच्या चौथ्या टप्प्यातही राज्यात सरासरी ६२ टक्के मतदान झाले आहे. मात्र, बीड आणि जालना या दोन मतदारसंघांमध्ये टक्केवारी वाढली असून त्याला जातीय संघर्षाची झालर असल्याची चर्चा आहे. राज्यातील ११ मतदारसंघांमध्ये





सोमवारी मतदान झाले. पुण्यात गतवेळच्या तुलनेत मत टक्का वाढला आहे. २०१९ मध्ये पुण्यात ४९.८९ टक्के मतदान झाले होते. यंदा ५२ टक्क्यांच्या आसपास मतदान झाले. गेल्या वेळी ६४ टक्के मतदान झाले होते. यंदा ६८ टक्क्यांपेक्षा अधिक मतदान झाले. आष्टी पाटोदा शिरूर मतदार संघाकडे जिल्ह्यातील नेत्यांचे लक्ष आहे.

## ठाणे लोकसभा नरेश म्हस्के यांना निवडून आणण्यासाठी कार्यकर्त्यांची दिवस रात्र मेहनत

नवी मुंबई / के एच. हनवते :- श्री दिलीप किसनराव आमले आपला माणूस शिवसेना एकनाथ शिंदे (गट) अब की बार ४०० पार, फिर एक बार मोदी सरकार..! भारताचे नरेंद्र मोदी, महाराष्ट्र राज्याचे लाडके लोकप्रिय मुख्यमंत्री मा श्री एकनाथजी शिंदे, मा श्री देवेंद्र फडवणीस उपमुख्यमंत्री, मा श्री अजित पवार उपमुख्यमंत्री, मा रामदासजी आठवले केंद्रीय मंत्री, मा राज ठाकरे अध्यक्ष मनसे, लोकनेते मा गणेशजी नाईक आमदार, सौ मंदाताई म्हात्रे आमदार, शिवसेना उपनेते मा श्री विजयजी नाहटा, मा विजय चौगुले शिवसेना जिल्हाप्रमुख, मा संजीव नाईक माजी खासदार , मा संदीप नाईक, जिल्हाध्यक्ष भाजपा मा अशोकराव गावडे महानगरप्रमुख, मा नामदेवजी भगत अध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस, यांच्या मार्गदर्शनाखाली ठाणे लोकसभा मतदार संघाचे उमेदवार श्री नरेश गणपत मस्के यांना कुठल्याही परिस्थितीत नवी मुंबई विभागातून जास्तीत जास्त प्रमाणात लिड देण्यासाठी नेरूळ सेक्टर ६, कुकशेत गावं सेक्टर १४, सारसोळे गाव येथे गेल्या दहा








दिवसापासून घरोघरी जाऊन वैयक्तिक भेटी घेऊन तसेच वचननामा वाटुन प्रचार तसेच चौक सभा मोठ्या प्रमाणात घेतल्या आहेत या ठिकाणांहून जास्त मतदान व्हावे म्हणून प्रयत्न चालू आहे महायुतीचे उमेदवार श्री नरेश म्हस्के यांच्या प्रचारार्थ विभागातील सर्व मित्र पक्षांचे मा महेश खरे नवी जिल्हाध्यक्ष (आरपीआय) आठवले गट, नेरुळ पश्चिम महायुतीतील पदाधिकारी नागरिक प्रचार करण्यासाठी येत आहे आमदार मा प्रशांत ठाकूर, शिवसेना उपनेते मा विजय नाहटा कार्य सम्राट, श्री सुरज पाटील मा नगरसेवक, सौ सुजाता पाटील मा नगरसेविका, सौ जयश्री ठाकुर मा नगरसेविका , श्री गणपत शेलार उपजिल्हाप्रमुख, सौ संगिताताई आमले उपजिल्हाप्रमुख, श्री दिलीप किसनराव आमले विभाग प्रमुख/अध्यक्ष वाहतूक सेना, श्री प्रदीप बुरकुल वार्ड अध्यक्ष, श्री यशवंत तांडेल, बबन महाजे, श्री अशोक त्रिपाठी, श्री ठाकुर तसेच विभागात महायुतीचे पदाधिकारी शेकडो नागरिक पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित असतात अशी माहीती दैनिक महावृत्त ला आपला माणूस शिवसेना विभागप्रमुख श्री दिलीप किसनराव आमले यांनी दिली.

## उद्धव ठाकरेंनी 'तमाम हिंदू बंधू आणि भगिनींनो' बोलायचं बंद केलं : देवेंद्र फडणवीस

'तमाम हिंदू बंधू आणि भगिनींनो' ही गर्जना कालपर्यंत उद्धव ठाकरेंकडून आपण ऐकत होतो , पण नुकतीच इंडिया आघाडीची बैठक पार पडली. आणि त्यांच्या सांगण्यावरून उद्धव ठाकरेंनी 'तमाम हिंदू बंधू आणि भगिनींनो' हे बोलायचं बंद केलं. आता ते नावदेखील घेत नाहीत ही खरोखर एक शोकंतिका आहे, अशी कडाडून टीका उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरेंवर केली.लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभुमीवर उमेदवारच्या प्रचारार्थ आज (दि. १७) दादरच्या शिवाजी पार्कमध्ये महायुतींची सभा सुरू आहे. यावेळी ते बोलत होते. उद्धव ठाकरे सरकारच्या काळात घरी बसून सुरु होते. त्यांच्याकडून आपल्याला 'माझं कुटूंब माझी जबाबदारी' या पलिकडे आपल्याला काहीचं ऐकायला मिळालं नाही. मात्र, पंतप्रधान मोदी यांच्या नेतृवाखाली राज्य सरकारने अनेक कामे केली आहेत. पंतप्रधान मोदी यांच्या सरकारने मुंबईचं परिवर्तन, अटल सेतू, मेट्रो, धारावीचं परिवर्तन अशी अनेक कामे



मुंबईकरांसाठी केली आहेत. इंडिया आघाडी मुंबईकरांसाठी काय केलं हे सांगू शकतील का? असा सवालही त्यांनी यावेळी केला. यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार , राज ठाकरे, पियुश गोयल, नारायण राणे, रामदास आठवले, जोगेंद्र कवाळे, अशिष शेलार, सुनिल तटकरे, आशोक चव्हाण हे उपस्थित होते.

## मधुमेह, हृदयविकारासह ४१ औषधे होणार स्वस्त

नवी दिल्ली : वृत्तसंस्था भारतातील काही महत्वपूर्ण आजारांच्या उपचारांमध्ये वापरल्या जाणा-या औषधांच्या किंमतींमध्ये दिलासा देण्याचा निर्णय भारत सरकारने नुकताच घेतला आहे. त्यानुसार, केंद्र सरकारने ४१ औषधांच्या आणि ६ फॉर्म्युलेशनच्या किंमती निश्चित केल्या आहेत.त्यानंतर, मधुमेह, अंगदुखी, हृदय, यकृत, अँटासिड, ऍलर्जी, मल्टिव्हिटॅमिन, अँटीबायोटिक्स इत्यादी किंमती निश्चित करण्यात आल्या आहेत. ज्यामुळे, आता नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे. या किंमती निश्चित केल्यामुळे ४१ औषधे स्वस्त होणार आहेत. यामुळे, तुम्हाला या सगळ्या आजारांवरील औषधांसाठी जास्त पैसे खर्च करावे लागणार नाहीत. औषधांच्या किमतींमध्ये दिलासा देण्याचा निर्णय हा नॅशनल फार्मास्युटिकल प्राइसिंग अथॉरिटी ऑफ इंडियाच्या १४३ व्या बैठकीत हा महत्वपूर्ण निर्णय घेण्यात आला. यासाठी राजपत्रित अधिसूचना जारी करण्यात आली आहे. दरम्यान, 'एनपीपीए' ही एक सरकारी नियामक संस्था असून जी भारतातील फार्मास्युटिकल औषधांच्या किंमती नियंत्रित करण्याचे काम करते.

# शिक्षकांनी राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुरूप मूल्य आणि कौशल्यधिष्ठीत विद्यार्थी घडवावेत -नूतन अध्यक्ष आदिनाथ सांगवे

लातूर :- आपल्या देशात राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०ची नियोजन प्रक्रिया पूर्ण झाली असून त्याची अंमलबजावणी विद्यापीठ अंतर्गत पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून सुरु झाली आहे. तर पदवी अभ्यासक्रमासाठी २०२४-२५ पासून सुरू होत आहे. तेव्हा महाविद्यालयातील शाळा व महाविद्यालयातील शिक्षकांनी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०चा सूक्ष्म आणि विश्लेषणात्मक पद्धतीने अभ्यास करून त्यामध्ये दिलेल्या दिलेली मूल्य आणि कौशल्य याला अनुसरून विद्यार्थी घडवावेत यामुळे आपला देश शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या समृद्ध होईल असे प्रतिपादन श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था, लातूरचे नूतन अध्यक्ष आदिनाथ सांगवे यांनी केले. श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था, लातूर द्वारा चालणाऱ्या सर्व युनिट प्रमुखांची सुसंवाद बैठक संस्था कार्यालयाच्या देशीकेंद्र विद्यालयाच्या सभागृहामध्ये आयोजित करण्यात आली होती यावेळी ते अध्यक्षीय समारोप करताना बोलत होते. यावेळी विचारमंचावर संस्थेचे सचिव माधवराव पाटील (टाकळीकर), उपाध्यक्ष माधवराव पाटील (तपसे चिंचोलीकर), सहसचिव सुनील मिटकरी, कोषाध्यक्ष विजयकुमार रेवडकर, संचालक राजेश्वर बुके, संचालक बसवराज (राजू) येरटे, संचालक काशिनाथ साखरे, संचालक राजेश्वर पाटील, संचालक प्रभूप्पा पटणे आणि संचालक गुरुलिंग धाराशिवे यांची प्रमुख उपस्थिती होती. पुढे बोलताना आदिनाथ सांगवे म्हणाले की, श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था द्वारा चालणाऱ्या सर्व शाळा, महाविद्यालय आणि अभियांत्रिकी महाविद्यालयातील शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विद्यार्थी हा केंद्रबिंदू मानून पालकांशी सुसंवाद प्रस्थापित करावा.



शासन मान्य प्रवेशित तुकड्यांमध्ये विद्यार्थ्यांची संख्या पूर्ण करून विनाअनुदानित तुकड्या सुद्धा पूर्ण क्षमतेने पूर्ण कराव्यात. महाविद्यालयात आलेल्या विद्यार्थ्यांनी पालकांचा सन्मान करून त्यांना आपल्या महाविद्यालयाच्या गुणवैशिष्ट्याची माहिती देऊन तो आपल्या महाविद्यालयातच प्रवेश घेईल याची आपण काळजी घ्यावी. शाळा आणि महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांसोबतच शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना ड्रेस कोड अनिवार्य करावा यामुळे प्रशासनामध्ये एकात्मता निर्माण होते तसेच आपली एक महाविद्यालयाविषयी स्वतंत्र ओळखही निर्माण होते असेही ते म्हणाले. यावेळी संस्थेचे सचिव माधवराव पाटील (टाकळीकर) प्रास्ताविक करताना म्हणाले की, श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था, लातूर ही महाराष्ट्रातील एक नामवंत आणि शैक्षणिकदृष्ट्या संपन्न अशी शिक्षण संस्था आहे. या संस्थेअंतर्गत विविध शाळा आणि महाविद्यालय चालविले जातात. विद्यार्थी हा कौशल्ययुक्त आणि रोजगाराभिमुख तयार करण्याची जबाबदारी ही आपल्या सर्वांची आहे. आपण सर्वांनी एकत्र येऊन समस्यांचे निराकरण करून आपले शैक्षणिक संकुल शैक्षणिक, सामाजिक आणि सांस्कृतिकदृष्ट्या संपन्न करण्यासाठी प्रयत्नशील राहू. संस्था पदाधिकाऱ्यांचे आपल्याला सक्रिय आणि सकारात्मक सहकार्य नक्की मिळेल असे आश्वासनही त्यांनी याप्रसंगी दिले. यावेळी महात्मा बसवेश्वर महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई, एम.एस.बिडवे अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य प्रा. बी. व्ही. धरणे, अभियांत्रिकी महाविद्यालय, अंबाजोगाई येथील ॲक्टींग प्राचार्य डॉ. एन. ए. रावबावळे, कै. पूज्य टी. बी. गिरवलकर तंत्रनिकेतन महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य प्रा. सुदीप झिरमिरे, श्री देशीकेंद्र विद्यालय, लातूरच्या मुख्याध्यापिका जयश्री ठवळे, श्री महात्मा बसवेश्वर प्राथमिक विद्यामंदिर, लातूरच्या मुख्याध्यापिका सुनिता पुरी, श्री निळकंठेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, लातूरचे मुख्याध्यापक रूपसिंग सगर, श्री शंभुलिंग शिवाचार्य माध्यमिक विद्यालय, लातूरचे मुख्याध्यापक शिवाजी कोळी, श्री शंभुलिंग शिवाचार्य प्राथमिक विद्यालय, लातूरचे मुख्याध्यापक योगीराज स्वामी, श्री महात्मा बसवेश्वर बालक मंदिर, लातूरच्या मुख्याध्यापिका राजश्री कोरपे यांच्या सह महात्मा बसवेश्वर कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. संजय पवार, पर्यवेक्षक प्रा. शिवशरण हावळे, प्रा. सुरेश बिराजदार, मनोज मोटे, नामदेव बेंदरगे व संस्था कार्यालय प्रमुख गुरलिंग शेटे यांची उपस्थिती होती. यावेळी उपाध्यक्ष माधवराव पाटील (तपसेचिंचोलीकर), सहसचिव सुनील मिटकरी, संचालक राजेश्वर बुके, संचालक बसवराज (राजू) येरटे, संचालक काशिनाथ साखरे, संचालक राजेश्वर पाटील, संचालक प्रभूप्पा पटणे, संचालक गुरुलिंग धाराशिवे यांनीही सर्व युनिट प्रमुखांना मार्गदर्शन केले. यावेळी सर्व युनिट प्रमुखांनी शाळा व महाविद्यालयातील प्रवेशित शासन मान्य संख्या, प्रवेशित संख्या, शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी, पायाभूत सोयीसुविधा व इतर शैक्षणिक विकासाची सविस्तर माहिती दिली. बैठकीनंतर सर्व संस्था पदाधिकाऱ्यांचा युनिट प्रमुखातर्फे यथोचित सन्मान करण्यात आला. शेवटी सर्वांचे आभार मनोज मोटे यांनी मानले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी कार्यालयीन प्रमुख गुरुलिंग शेटे, सागर खराडे, शुभम वारद, चंद्रसेन सूर्यवंशी, नागेश चौधरी, गलगले आप्पा, राजाभाऊ बोडके आणि सर्व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

## संपादकीय....

# वाहन विक्रीला 'विद्युत'वेग

फेडरेशन ऑफ ऑटोमोबाईल डिलर्स असोसिएशन(एफएडीए)च्या मते, आर्थिक वर्ष २०२३-२४ मध्ये भारतात सुमारे ९० हजारांपेक्षा अधिक इलेक्ट्रिक गाड्यांची विक्री झाली. तत्पूर्वी गेल्या आर्थिक वर्षात सुमारे ४७ हजार इलेक्ट्रिक मोटारींची विक्री झाली होती. म्हणजे एक वर्षांत त्याची विक्री ९० टक्क्यांनी वाढली आहे, हे स्पष्ट होते. गेल्या दोन वर्षांत विक्री होणारे प्रत्येक दुसरे वाहन तीनचाकी ई-वाहन होते. ई-रिक्षांच्या वाढत्या लोकप्रियतेने यात मोठी भूमिका बजावली आहे.

भारतातील नागरिक खर्च कमी करण्यासाठी आणि प्रदूषणात घट करण्यासाठी इलेक्ट्रिक वाहनांना पसंती देत आहेत. देशात गेल्या वर्षांत ई-मोटारीच्या विक्रीत ९० टक्के वाढ झाली आहे. एका अंदाजानुसार, २०३० पर्यंत भारतात विक्री होणारी प्रत्येक तिसरी गाडी ही इलेक्ट्रिक असेल. एका ग्राहकाने इलेक्ट्रिक वाहनाच्या खरेदीचा अनुभव सांगितला. ते म्हणतात, सर्वात अगोदर मी पेट्रोल कार खरेदी केली. मात्र महागाई पाहता डिझेल मोटार घेतली. मात्र डिझेलही महाग झाले आहे, त्यामुळे गेल्यावर्षी एक इलेक्ट्रिक मोटार खरेदीचा निर्णय घेतला. डिझेल मोटारीच्या तुलनेत ई-व्हेईकलवर कमी खर्च होतो आणि त्यामुळे प्रदूषणही कमी होते. एका वापरकर्त्याच्या माहितीनुसार, गेल्या नऊ महिन्यांत त्याची इलेक्ट्रिक मोटार ४० हजार किलोमीटरपेक्षा अधिक धावली आहे. वास्तविक, आतापर्यंतचा अनुभव हा चांगला राहिला आहे. मात्र त्यांनी दोन समस्या सांगितल्या. ते म्हणतात, दिल्लीसारख्या शहरात चार्जिंग स्टेशनची व्यवस्था अपुरी आहे.अनेकदा तर गुगल मॅपवर चार्जिंग स्टेशन्स दिसतात; परंतु लोकेशनवर पोहोचताच ते स्टेशन बंद असल्याचे दिसून येते. दुसरी तक्रार ईव्ही रेंजची. ते म्हणतात, माझी मोटार पूर्ण चार्ज झाल्यानंतर सुमारे २२० किलोमीटर धावते. अशा वेळी परिसरात सहजपणे जाऊ शकतो. मात्र लांब पल्ल्याचा प्रवास करताना विचार करावा लागतो. उदा. माझी गाडी फूल चार्ज केल्यानंतर दिल्लीला पोहोचते खरे; परंतु परत येण्यासाठी ती मला पुन्हा चार्ज करावी लागते. यात सुमारे दीड तास लागतो आणि पाचशे ते सहाशे रुपये खर्च होतात. सरकारी आकडेवारीनुसार, फेब्रुवारी २०२४ मध्ये भारतात सुमारे १२ हजार सार्वजनिक ईव्ही चार्जिंग स्टेशन्स सक्रिय होते. त्याचवेळी ऑगस्ट २०२३ पर्यंत देशात ई-वाहनांची संख्या २८ लाखांवर पोहोचली. म्हणजेच एका सार्वजनिक चार्जिंग स्टेशनमागे सरासरी २३० गाड्या आहेत.

गेल्या दोन वर्षांत विक्री होणारे प्रत्येक दुसरे वाहन तीनचाकी ई-वाहन होते. ई-रिक्षांच्या वाढत्या लोकप्रियतेने यात मोठी भूमिका बजावली आहे. ई-रिक्षा खरेदीसाठी अनेक एनबीएफसी कंपन्या सहजपणे कर्ज देत आहेत. प्रत्येक व्यक्ती २५ ते ३० हजार रुपये भरत ई-रिक्षा खरेदी करू शकतो. त्याच्या मदतीने तो दरमहा २५ ते ३० हजार कमाई करू शकतो. यात सर्व्हिसिंगचाही अधिक ताण नाही. संयुक्त राष्ट्राच्या अहवालानुसार, इलेक्ट्रिक गाड्या हवेतील प्रदूषण कमी करण्यात मदत करतात. कमी कार्बन उत्सर्जन करतात. इलेक्ट्रिक गाड्यांसाठी जीवाश्म इंधनापासूनच तयार होणार्या विजेने चार्ज केले जाते.

ही बाब पर्यावरणासाठी लाभदायी नाही. अशा वेळी ई-वाहनांना सौर ऊर्जेसारख्या क्लिन एनर्जीने चार्ज केल्यास पर्यावरणासाठी ही बाब उपयुक्त राहील. तसेच नवीन ई-वाहन तयार करण्यासाठी खनिज आणि मौल्यवान धातूंची गरज भासते. या खनिजांचे आणि धातूंचे उत्खनन केल्याने कार्बन उत्सर्जन होते. अशा वेळी ई-वाहने दीर्घकाळ चालविणे फायद्याचे राहू शकते. केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी इलेक्ट्रिक वाहनांच्या मुद्द्यावरून आग्रही भूमिका घेतली आहे. त्यांनी ईव्ही एक्स्पो २०२३ मध्ये बोलताना, भारतात २०३० पर्यंत दरवर्षी एक कोटी वाहनांची विक्री होण्याची शक्यता वर्तविली. या विक्रमी विक्रीमुळे देशात पाच कोटी रोजगारांची निर्मिती होण्याची अपेक्षा आहे.

# महिला मतदार 'संविधानाची देणगी' राखणार का?

जगातील सर्वात मोठी लोकशाही असलेल्या भारतात १७ व्या लोकसभा निवडणूकीत ९६.८८ कोटी मतदार नोंदणीकृत आहेत; त्यांपैकी ४७.१० कोटी ही संख्या महिला मतदारांची आहे. जगभरात महिलांना मतदानाचा अधिकार मिळवण्यासाठी संघर्ष करावा लागला होता. अमेरिकेसारख्या विकसित देशानेसुध्दा महिलांना मतदानाचा अधिकार देण्यासाठी स्वातंत्र्यानंतर १४५ वर्ष लावली. भारत हा जगातील त्या देशांपैकी एक आहे ज्याने देशाचे संविधान लागू होताच देशातील २१ वर्षावरील सर्व नागरिकांना जात-धर्म-भाषा-लिंग या आधारे कुठलाही भेदभाव न करता 'एक व्यक्ती, एक मत आणि एक मूल्य' असा सार्वत्रिक प्रौढ मताधिकार दिला! ही आपल्या संविधानाची देणगी आहे.

आज पंतप्रधान नरेंद्र मोदी हे अनेकदा ठणकावून सांगत आहेत की ते संविधानाच्या विरोधात नाहीत, तरी रा. स्व. संघाच्या धुरिणांनी संविधान-निर्मितीच्या वेळी आजच्या तरतुदींना स्पष्ट विरोध केला होता, याच्या नोंदी उपलब्ध आहेत- त्या कोण, कशा खोडून काढणार? भाजपची रा. स्वने मात्र या सार्वत्रिक प्रौढ मताधिकाराचा त्यावेळी विरोध केला होता. त्यांच्या 'ऑर्गनायझर' या इंग्रजी मुखपत्रातील संपादकीय लेखात लिहिले आहे की परंतु राजकीय मुद्यांवर विचार करण्याची आणि हुशारीने मतदान करण्याची सामान्य माणसाचे मानसिक शैथिल्य लक्षात घेऊन, आपण सार्वत्रिक प्रौढ मताधिकाराबद्दल जास्त आशावादी असू शकत नाही. मात्र देशाच्या संविधान निर्मात्यांनी या जनतेवर पूर्ण विश्वास ठेवला आणि तो विश्वास खरा ठरला. गेली ७५ वर्षे आपला देश लोकशाही आणि संविधानानुसार चालू आहे. डिसेंबर १९४९ , 'ऑर्गनायझर'च्या संपादकीय लेखानुसार प्राचीन भारतातील असाधारण घटनात्मक विकासाचा आपल्या राज्यघटनेत उल्लेख नाही मनुस्मृतीत सांगितलेल्या कायद्यांचे जगभर कौतुक केले गेलेले आहे पण आपल्या घटनेच्या पंडितांना त्याचे काही महत्त्व नाही. - ही तीच 'मनुस्मृती', ज्यात दलितांविषयी आणि महिलांविषयी अमानवी व क्रूर नियम लिहिलेले आहेत. भाजपनेत्यांची मनुधार्जिणी विचारसरणी त्यांच्या वक्तव्यांमधून आणि कृतीमधून वेळोवेळी उघड झाली आहे. यापैकी काही नेत्यांनी तर महिलांना देशहितासाठी चार ते दहा मुले जन्माला घालण्याचे सल्ले दिले आहेत. उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी लिहिलेल्या भारतीय संस्कृतीत महिलांची भूमिका या लेखामधील महिलांना स्वातंत्र्याची नाही तर संरक्षणाची गरज आहे महिला कधी स्वावलंबी होऊ शकत नाही.. या वाक्यांतून दिसणारी त्यांची मानसिकता महिलांवर विश्वास ठेवणारी आहे, असे कोण म्हणेल?भाजपची मानसिकता तर यातूनही दिसून येते की कायद्यानुसार नवीन संसद भवनाचे उद्घाटन करण्याचा अधिकार देशाच्या प्रथम नागरिक राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचा असूनही उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले! त्या वेळी, द्रौपदी मुर्मु विधवा-आदवासी-महिला आहे म्हणून त्यांना टाळले गेल्याचे आरोप गाजले होते, त्यांना उत्तर देण्याऐवजी शीर्षस्थ नेत्यांनी मौन पाळून हे आरोप करणाऱ्या प्रवृत्तींनाच खतपाणी कसे काय घातले? हाच आहे का भाजपचा महिलांप्रती आणि देशाच्या सर्वोच्च पदाप्रतीचा सन्मान? 'बहुत हुआ नारी पर वार' अशी घोषणा देऊन सत्तेत आलेल्या मोदींनी गेल्या १० वर्षात महिलांवरचे किती वार रोखले? उन्नाव बलात्कार प्रकरणातील दोषी कुलदिपसिंग सेंगरच्या पाठीशी भाजप आजही आहे. बिल्कीस बानोच्या १४ कुटूबीयांची हत्या करणाऱ्या, तिच्यावर सामूहिक बलात्कार करणाऱ्या ११ गुन्हेगारांची शिक्षा माफ केली गेली तेव्हा भाजपच्या नेत्यांकडून त्या दोषसिद्ध गुन्हेगारांचे स्वागत मिठाई वाटून व रॅली काढून केले जाते व त्यांना संस्कारी म्हटले जाते. बलात्कार आणि खुनाच्या आरोपात शिक्षा भोगत असणाऱ्या बाबा राम रहीमला फक्त चारच वर्षांत नऊ वेळा पॅरोलवर भाजपचे हरियाणा सरकार बाहेर का सोडते? अलीकडे तर त्याला झेड्प्लस सुरक्षा सुद्धा देण्यात आली होती. २०२२ मध्ये 'बुल्लीबाई प'द्वारे समाजमाध्यमांवर, सत्ताधाऱ्यांच्या चुकीच्या धोरणांविरोधात आवाज उठवणाऱ्या मुस्लिम महिलांचे फोटो विचित्रपणे फोटोशॉप करुन प्रसारीत केले गेले. या महिलांसाठी त्या 'प'वरून बोली लावली जात होती. ते प बनवणाऱ्या सहा आरोपींना अटक करण्यात आले पण नंतर त्यांना सोडून देण्यात आले ते कोणाच्या मध्यस्थीने?

२०१९ ते २०२१ दरम्यान बेपत्ता झालेल्या तब्बल १३ लाख महिलांबाबत एकही शब्दही न बोलणारे पंतप्रधान तीन तथाकथित बेपत्ता मुलींवर बनलेला 'केरला स्टोरी' हा प्रचारपट पाहण्याचा आग्रह त्यांच्या प्रचारसभांतून करत होते. लोकसभा निवडणुकीसाठी आज वाराणसी तर उद्या घाटकोपर असे रोडशो करण्यासह अनेक राज्यांत सभा घेणाऱ्या मोदींना आतापर्यंत मणिपूरला जाण्यासाठी वेळच कोणत्या कारणामुळे मिळालेला नाही?

महिला कुस्तीपटूंच्या आंदोलनावर स्वत:च्या अखत्यारीतील बळाचा वापर करणाऱ्या आणि साक्षी मलिकने कुस्ती सोडण्याच्या निर्णयकडेही दुर्लक्ष करणाऱ्या सत्ताधाऱ्यांनी लैंगिक शोषणाचे गंभीर




आरोप असणाऱ्या भाजप खासदार ब्रिजभूषण सिंगवर कारवाई केली नाही. उलट त्याच्या मुलाला भाजपने लोकसभेची उमेदवारी जाहीर केली आहे. भाजपचे नेते देवराजे गौडा यांचे म्हणणे आहे की प्रज्वल रेवण्णा यांच्या कथित लैंगिक शोषणाबद्दल गेल्या वर्षी भाजप नेतृत्वाला त्यांनी सावध केले होते आणि त्याला तिकिट देऊ नये असे सांगितले होते. मग भाजपने रेवण्णाला तिकीट का दिले? संदेशखालीमध्ये झालेल्या महिला हिंसाचाराच्या विरोधात मोदी मात्र मोठे आक्रमक होऊन बोलतात. म्हणजे आरोपी जर विरोधी पक्षातील असेल तर मोदी मौन व्रत तोडणार आणि आरोपी जर भाजपमधील असतील तर मोदींचे, भाजपच्या इतर नेत्यांचे आणि महिला व बाल विकास मंत्र्यांचेसुध्दा मौन राहणार. अशा निवडक नैतिकतेमुळे आज बलात्कारी सुरक्षित आणि बेटी असुरक्षित आहे. गेल्या दहा वर्षात महिला अत्याचारात ३५ टक्क्यांनी ने वाढ झाली आहे. राष्ट्रीय गुन्हे नोंद अहवाल-२०२३ (एनसीआरबी) च्या आकडेवारीनुसार दर एक तासाला महिला अत्याचाराच्या ५१ घटना घडतात.राजकारणात महिलांची भागीदारी वाढवण्यासाठी महिला आरक्षण विधेयक संमत करून घेतल्याचा डंका पंतप्रधानांनी वाजवला असला तरी राज्य किंवा राष्ट्रीय पातळीवरील निवडणुकीच्या तिकिटांमध्ये महिलांना ३३ टक्के प्रतिनिधित्व देण्याच्या जवळपासही ते कधीच आलेले नाही. उलट २०१५ मध्ये, हरियाणा आणि राजस्थान मधील भाजप सरकारच्या काळात पंचायत राज कायद्यामध्ये किमान शिक्षणाची अट जोडून महिलांच्या राजकारणातील भागीदारीवर गदा आणली गेली. महिलांसाठी ज्या योजना भाजपने लागू केल्या त्याचे वास्तव काय आहे? २०१४ ते २०२१ दरम्यान 'बेटी बचाओ-बेटी पढ़ाओ' योजनेसाठी दिलेल्या आर्थिक तरतुदीपैकी तब्बल ५८ टक्के रक्कम ही केवळ जाहिरातींवर खर्च केली गेली (या जाहिरातींवर कोणाचे छायाचित्र अनिवार्य होते, हे सांगायला हवे का?)!

'प्रधानमंत्री उज्वला योजने'च्या अंमलबजावणीबाबत २०१९ मध्ये नियंत्रक आणि महालेखा परीक्षक (कॅग) यांनी चिंता व्यक्त केली होती. राज्यसभेत मंत्र्यानी दिलेल्या माहितीनुसार या योजनेअंतर्गत २०२३ पर्यंत, केंद्र सरकारने ९.६ कोटी सिलिंडरचे वितरण केले. तथापि, वितरीत केलेल्या सिलेंडरपैकी योजनेच्या ९.६ टक्के लाभार्थींनी एकदाही सिलिंडर भरले नाही तर ११.३ टक्के लाभार्थींनी फक्त एकदा सिलिंडर भरून घेतला. ५६.५ टक्के लाभार्थी चारपेक्षा जास्त वेळा सिलिंडर भरू शकलेले नाहीत, कारण गॅस सिलिंडरचे वाढते भाव. सामान्यांसाठी तर, २०१४ मध्ये ४१० रुपयांना असलेला गॅस सिलिंडर २०२३ मध्ये ११०० रुपयांवर गेला.

२०२२ पासून देशातील सहा लाख आशा कर्मचारी मानधन वाढीसाठी आणि इतर सोयी सुविधांसाठी आंदोलन करत आहेत. मात्र केंद्र सरकारने अंगणवाडी सेवांच्या तरतुदीतच ४० टक्के कपात केली आहे. 'राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षण- ५' नुसार, भारतातील १५ ते ४९ वयोगटातील तब्बल ५७ टक्के महिला निमिक (अशक्त) आहेत. महासत्ता बनू पाहणाऱ्या देशात महिलांना पुरेसे अन्नदेखील मिळू नये? 'प्रधानमंत्री मातृ वंदना' योजना जाहीर केल्यानंतर प्रत्यक्षात लागू करण्यासाठी तीन वर्षांचा विलंब लावण्यात आला तसेच आर्थिक भत्ता सहा हजार रु. वरून पाच हजार रु. करण्यात आला. महिलांना हा भत्ता मिळण्यासाठी अर्थमंत्र्यांनी एवढ्या अटी लावल्या आहेत की परिणामी देशातील ५० टक्क्केपेक्षा जास्त महिला या योजनेतून वगळल्या गेल्या आहेत. आजच्या 'व्हॉट्सप युनिव्हर्सिटी आणि गोदी मिडीया' या स्थितीत योजनांच्या अमलबजावणीचे हे वास्तव जनतेपर्यंत पोहोचणे अवघड झाले आहे. अर्थात, भाजपची विचारधाराच समतावादी नसल्याने महिलांच्या उद्धारासाठी भाजप काही करेल अशी अपेक्षा हाच एक भ्रम होता. असे प्रचारकी भ्रम नाकारण्यासाठी या वेळेची लोकसभेची निवडणूक ही निर्णायक ठरते आहे. संवैधानिक मूल्यांची आबाळ सध्याच्या सत्ताधाऱ्यांनी चालवल्याची चर्चाही ऐरणीवर आलेली आहे. यादृष्टीने देशाच्या मतदारसंख्येत जवळपास निम्मा वाटा असलेल्या महिला मतदार सजग आहेत की नाही, केवळ मताधिकारच नव्हे तर समता, स्वातंत्र्य आणि न्याय ही मूल्येदेखील संविधानाची देणगी आहेत. ती देणगी कायम राखण्यासाठी महिला मतदार काय करू शकतात, दाखवून देणारी ही निवडणूक ठरेल.

# आणि 'आपल्या'च देशांत अहमदिया ठरले गैरमुस्लीम

१४ ऑगस्ट १९४७ रोजी पाकिस्तानची निर्मिती झाली. इंग्रज आपल्या देशातून निघून गेल्यावर हिंदू आणि मुस्लिम यांना एका देशात नांदणे शक्य नाही, असा मुद्दा लावून धरला गेला. त्यातूनच द्विराष्ट्रवाद या संकल्पनेला खतपाणी घालण्यात आले आणि धर्मावर आधारित या देशाची म्हणजे पाकिस्तानची निर्मिती झाली. हिंदूंच्या तथाकथित जाचातून सुटका झाल्यावर हा देश सुखाने नांदण्यास काहीच हरकत नव्हती. पण तसे झाले नाही.



पाकिस्तानचा गेल्या ७६ वर्षांचा इतिहास हा रक्तरंजित घटनांनी भरलेला आहे. यासाठी हिंदू जबाबदार नाहीत हे मान्य करण्याइतका विचारीपणा त्या देशाकडून दाखवल्या गेला नाही. तो देश अस्तित्वात येऊन सहा वर्षे पूर्ण होत नाहीत तोच त्या देशाला गंभीर आणि मूलभूत समस्येने ग्रासले. तिची धग आजही कायम आहे. १९५३ साली पाकिस्तानच्या पंजाब प्रांतात अहमदिया मुसलमानांना गैरमुस्लिम घोषित करावे या मागणसाठी तीव्र आंदोलन उभारण्यात आले. या हिंसक आंदोलनात अनेक अहमदियांचा बळी गेला.

या दंगलीची चौकशी करण्यासाठी न्या. मुनीर यांच्या अध्यक्षतेखाली द्विसदस्यीय आयोग गठित करण्यात आला. मुसलमान कोणास म्हणावे याची परिभाषा निश्चित करण्याचे काम या आयोगाकडे सोपविण्यात आले होते. ही मोठीच विटंबना नाही का? मुसलमानांसाठी वेगळा देष मागणाऱ्यांवर सहा वर्षातच अशी वेळ यावी यातून द्विराष्ट्रवाद या संकल्पनेचा फोलपणा उघड होतो.

या आयोगाने अशी परिभाषा निश्चित करण्यासाठी अनेक मुल्ला, मौलवी व उलेमानांचे मत अजमावण्याचे ठरविले. ही मते नोंदवत असतांना आयोगास आढळून आले की स्वतःला इस्लामचे पाईक समजणाऱ्या या धार्मिक नेत्यांमधे एकवाक्यता नाहीच शिवाय वैचारिक गोंधळ आहे. आयोगाने असे मत नोंदविले की कुराणावर आधारित मुस्लिम राजकीय व्यवस्थेची मागणी करीत असतांना या नेत्यांमध्ये वैचारिक स्पष्टता अपेक्षित होती. यामुळे आयोगास ठोस अशी परिभाषा ठरविणे शक्य झाले नाही. या देशाची निर्मिती करणाऱ्या नेत्यांवर ही जबाबदारी होती. ती त्यांनी पार पाडली नाही, असा निष्कर्ष या आयोगाने काढला. आयोगाने त्यावेळच्या सरकारला असे निर्देष दिले की आता तरी गंभीरपणे विचार करत काय चुकले, याचा शोध घ्यावा.

पाकिस्ताननामक देशात असा सारासार विचार करण्याच परिपाठ न रुजल्याने आयोगाचा अहवाल २० वर्षे धूळ खात पडला. १९७३ साली या देशात नवीन घटना लागू झाली. एक वर्षाच्या आतच या घटनेत सुधारणा करून अहमदिया मुसलमानांना गैरमुस्लिम घोषित करावे अशी मागणी कट्टरवाद्यांकडून लावून धरण्यात आली. धार्मिक संघटनांच्या दबावापुढे झुकत त्यावेळच्या झुल्फीकार अली भुट्टो सरकारने ७ सप्टेंबर १९७४ रोजी दुसऱ्या घटनादुरुस्तीद्वारे अहमदिया समुदायास गैरमुस्लिम ठरविले.

इतकेच नव्हे तर या घटनादुरुस्तीद्वारे अहमदियांना पाकिस्तानचे अध्यक्ष वा पंतप्रधान होण्यापासून वंचित ठेवण्यात आले. अहमदियांवर खुल्या प्रवर्गातील जागांवर निवडणुक लढविण्यावर बंदी घालण्यात आली. याचाच अर्थ असा की हिंदू, शीख व ख्रिश्चन या अल्पसंख्य समुदायांप्रमाणेच अहमदियांनाही दुय्यम नागरिकत्वाचा दर्जा देण्यात आला.

७ सप्टेंबर २०२४ रोजी या भेदभावपूर्ण व दमनकारी घटनेस ५० वर्षे पूर्ण होत आहेत. गौरवशाली घटनेचा सुवर्णमहोत्सव साजरा करण्याची रीत जगन्मान्य आहे. पाकिस्तान अर्थातच याला अपवाद आहे. कारण त्या देशात अभिमानास्पद असे काही घडतच नाही. जमात-ए-इस्लामी या संघटनेचे प्रमुख व नॅशनल असेंब्लीचे सदस्य मौलाना फजरुल रेहमान यांनी १ मे रोजी घोषणा केली की या घटनेला ५० वर्षे पूर्ण होत असल्याने ७ सप्टेंबर रोजी त्यांच्या संघटनेद्वारे लाहोरस्थित मिनार-ए-पाकिस्तान या ठिकाणावर भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येईल. यातून पाकिस्तानातील धार्मिक कट्टरवाद्यांची विकृत मनोवृत्ती दिसून येते. कोण खरा मुसलमान आहे, हे दाखविण्याची या देशात जीवघेणी स्पर्धा लागलेली आहे.

आज पाकिस्तानात शियांनासुद्धा आपली ओळख लपवावी लागते, तेथे इतर समुदायांची काय गत होत असेल याची कल्पनाच केलेली बरी. आज या अनुषंगाने एक बाब नमूद करणे आवश्यक ठरते. ती म्हणजे-पाकिस्तानचे पहिले परराष्ट्रमंत्री जफरुल्ला खान हे अहमदिया होते. त्यांनी १९४८ साली संयुक्त राष्ट्रसंघाच्या समितीपुढे काश्मीर प्रश्नावर सक्षमपणे पाकिस्तानसाठी वकिली केली होती. असे म्हणतात की २३ मार्च १९४० च्या लाहोर ठरावाचे प्रारूप जफरुल्ला खान यांनीच तयार केले होते. जिनांना मात्र ही बाब लपवून ठेवावी लागली. हा धर्मांध देश आपल्याच बांधवांप्रती कसा कृतघ्न होऊ शकतो याचेच हे ज्वलंत उदाहरण आहे.

# मधुमेह, हृदयविकार अन् इतर अनेक आजारांवरील ४१ औषधे होणार स्वस्त,च्या बैठकीत निर्णय




भारतातील काही महत्वपूर्ण आजारांच्या उपचारांमध्ये वापरल्या जाणाऱ्या औषधांच्या किंमतींमध्ये दिलासा देण्याचा निर्णय भारत सरकारने नुकताच घेतला आहे. त्यानुसार, केंद्र सरकारने ४१ औषधांच्या आणि ६ फॉर्म्युलेशनच्या किंमती निश्चित केल्या आहेत.

त्यानंतर, मधुमेह, अंगदुखी, हृदय, यकृत, अँटासिड, ॲलर्जी, मल्टिव्हिटॅमिन, अँटीबायोटिक्स इत्यादी किंमती निश्चित करण्यात आल्या आहेत. ज्यामुळे, आता नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे. या किंमती निश्चित केल्यामुळे ४१ औषधे स्वस्त होणार आहेत. यामुळे, तुम्हाला या सगळ्या आजारांवरील औषधांसाठी जास्त पैसे खर्च करावे लागणार नाहीत. औषधांच्या किंमतींमध्ये दिलासा देण्याचा निर्णय हा नॅशनल फार्मास्युटिकल प्राइसिंग अथॉरिटी ऑफ इंडियाच्या १४३ व्या बैठकीत हा महत्वपूर्ण निर्णय घेण्यात आला. यासाठी राजपत्रित अधिसूचना जारी करण्यात आली आहे. दरम्यान, ही एक सरकारी नियामक संस्था असून जी भारतातील फार्मास्युटिकल औषधांच्या किंमती नियंत्रित करण्याचे काम करते.

# शेअर बाजारात चढ-उताराचा खेळ, सेन्सेक्स- निफ्टी सपाट

लोकभा निवडणुकीच्या निकालाच्या आधी भारतीय शेअर बाजारात अस्थिरता वाढली आहे. या पार्श्वभूमीवर सेन्सेक्स आणि निफ्टी ५० निर्देशांकात बुधवारी (दि.१५) चढ-उतार दिसून आला. तीन दिवसांच्या तेजीनंतर आज सेन्सेक्स, निफ्टी सपाट पातळीवर बंद झाले. बीएसई सेन्सेक्स ११७ अंकांनी घसरून ७२,९८७ वर बंद झाला. तर निफ्टी १७ अंकांच्या किरकोळ घसरणीसह २२,२०० वर स्थिरावला. बीएसई मिडकॅप ०.६ टक्क्यांनी तर स्मॉलकॅप ०.९ टक्क्यांनी वाढून बंद झाला.बाजारातील ठळक घडामोडी मिडकॅप, स्मॉलकॅप निर्देशांकात सलग चौथ्या सत्रांत तेजी सेन्सेक्सवर एचडीएफसी बँकेचा शेअर्स १.५ टक्क्यांनी घसरला निफ्टीवर सिप्ला आणि कोल इंडिया यांचे शेअर्स ३ आणि ४ टक्क्यांनी वाढले शेअर बाजाराने आज तेजीत सुरुवात केली होती. पण त्यानंतर त्यात काही प्रमाणात घसरण झाली. क्षेत्रीय पातळीवर निफ्टी पीएसयू बँक निर्देशांक १.४ टक्क्याने, तर निफ्टी रियल्टी, ऑईल आणि गॅस दोन्ही १ टक्क्यानी वाढले. निफ्टी एफएमसीजी निर्देशांक १ टक्क्याने खाली आला. निफ्टी ऑटो ०.५ टक्क्यांनी घसरला. निफ्टी बँक आणि निफ्टी प्रायव्हेट बँक निर्देशांक प्रत्येकी ०.३ टक्क्यांनी घसरले. कोणते शेअर्स टॉप गेनर्स, टॉप लूजर्स? सेन्सेक्सवर एशियन पेंट्स, एचडीएफसी बँक, टाटा मोटर्स, सन फार्मा, जेएसडब्ल्यू स्टील, हिंदुस्तान युनिलिव्हर, नेस्ले इंडिया हे शेअर्स घसरले. तर भारती एअरटेल, पॉवर ग्रिड, एनटीपीसी, एम अँड एम, एलटी, एचसीएल टेक या शेअर्समध्ये वाढ दिसून आली.निफ्टीवर आयशर मोटर्स, बजाज ऑटो, टाटा मोटर्स, एशियन पेंट्स, ब्रिटानिया हे शेअर्स टॉप लूजर्स ठरले. हे शेअर्स १ ते २ टक्क्यांनी घसरले. तर सिप्ला, कोल इंडिया, बीपीसीएल, भारती एअरटेल, एनटीपीसी टेक हे शेअर्स टॉप गेनर्स राहिले.एम अँड एम, स्पाईसजेट तेजीत सेन्सेक्सवर एम अँड एमचा शेअर्स १.५ टक्क्यांनी वाढून २,३०५ रुपयांवर पोहोचला. हा या शेअर्सचा सर्वकालीन उच्चांक आहे. तसेच स्पाईसजेट लिमिटेडच्या शेअर्समध्ये बुधवारी सलग चौथ्या सत्रात वाढ दिसून आली. बीएसईवर या शेअर्सने ५ टक्क्यांनी वाढ नोंदवून ६० रुपयांचा दिवसाचा उच्चांक गाठला. स्पाईसजेटने नुकतीच ३१ मे २०२४ पासून दिल्ली आणि फुकेतला जोडणारी दैनंदिन नॉन-स्टॉप विमान सेवा सुरू करणार असल्याचे जाहीर केले होते. परदेशी गुंतवणूकदारांचा विक्रीवर जोर मे महिन्यात परदेशी गुंतवणूकदारांकडून भारतीय शेअर बाजारात विक्री अधिक राहिली आहे. मे महिन्यात आतापर्यंत परदेशी गुंतवणूकदारांनी एकूण ३३,५४० कोटी रुपयांच्या शेअर्सची विक्री केली आहे.

# चहात ‘या’ फुलाच्या पाकळ्या घातल्याने डायबिटीस कमी करण्याचा मार्ग होईल सोपा? तज्ज्ञांनी सांगितलं किती हवं प्रमाण?




जी तुमची आवड तेच तुमचं औषध असं जर झालं तर जगात सगळेच किती निरोगी होतील नाही का? तुम्ही जर चहा प्रेमी असाल तर आम्ही आज तुम्हाला चहाची एक अशी रेसिपी सांगणार आहोत जी तुमच्या आरोग्याला सुद्धा हातभार लावू शकेल. सध्या ऑनलाईन चालू असणाऱ्या चर्चांनुसार तर ही रेसिपी तुम्हाला मधुमेह बरा करण्यासाठी सुद्धा मदत करू शकते असे समजतेय. अर्थात आपण चर्चांवर अवलंबून न राहता याविषयी थेट तज्ज्ञांचंच मत जाणून घेणार आहोत.

न्यूट्रिशनिस्ट आणि डिजिटल क्रिएटर चारमेन हा डोमिंग्वेझ यांनी सुचवलेला चर्चेतील पर्याय म्हणजे तुम्ही तुमचा टाइप २ मधुमेह बरा करण्यासाठी हिबिस्कस किंवा जमैका म्हणजेच जास्वंदाच्या फुलांचा वापर करू शकता.

चारमेन यांनी त्यांच्या रीलमध्ये, तिने जास्वंदाच्या पाकळ्यांचा चहा किंवा नुसतंच पाणी पिण्याचा सल्ला दिला आहे. यात साखर न घालता तुम्हाला हे गरम पेय प्यायचे आहे. यामध्ये असणारे अँटिऑक्सिडंट्स व व्हिटॅमिन सी शरीराला महत्त्वाचे फायदे देऊ शकतात असेही त्यांनी सांगितले आहे.आहारतज्ज्ञांचं मत काय, जास्वंदाचा चहा काय फायदे देतो? धी हॉस्पिटलच्या मुख्य आहारतज्ज्ञ आणि पोषणतज्ज्ञ शुभा रमेश एल यांनी इंडियन एक्सस्प्रेसला सांगितले की, हिबिस्कस किंवा जमैका टाइप २ मधुमेह पूर्ण बरा करू शकतात हे सांगणारा कुठलाही ठोस पुरावा नसला तरी, काही अभ्यासांमध्ये असे सुचवले आहे की जास्वंदीचा चहा रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित करण्यात मदत करू शकतो.

जास्वंदामध्ये ऑरगॅनिक ॲसिडस्, फ्लेव्होनॉइड्स आणि अँथोसायनिन्स असतात, ज्यांचा फायदा उच्च रक्तदाब कमी करण्यासाठी तसेच लिपिड-कमी करण्यासाठी होऊ शकतो. मधुमेह नियंत्रणात ठेवण्यासाठी सुद्धा याची मदत होऊ शकते. लक्षात घ्या हे उपाय तुम्हाला पूर्ण बरे करू शकत नाहीत पण तुमच्या आरोग्यावर नियंत्रण मिळवण्यासाठी मदत करू शकतात. जास्वंदाचा चहा किती प्रमाणात घ्यावा? आहारतज्ज्ञ शुभा असेही सांगतात की, अमुक प्रमाणात जास्वंदाचे सेवन केल्याने मधुमेह नियंत्रणात ठेवता येतो असा काही लिखित निश्चित नियम नाही. पण बहुतांश अभ्यासांमध्ये समोर आलेल्या माहितीनुसार दररोज एक ते दोन कप जास्वंदाच्या चहाचे सेवन हे फायदेशीर ठरू शकते. अर्थात फायदे मिळवण्यासाठी तुम्ही किती वेळ जास्वंद पाण्यामध्ये भिजवता व किती प्रमाणात घेता हे सुद्धा महत्त्वाचे मुद्दे आहेत.

लक्षात ठेवायच्या गोष्टी!शुभा सांगतात की, जास्वंद मध्यम प्रमाणात वापरल्यास बहुतेक लोकांसाठी सुरक्षित मानले जाते. मात्र हे लक्षात घ्यायला हवे की या औषधी वनस्पतीमध्ये लघवीचे प्रमाण वाढवणारे घटक असतात जे सामान्यतः मधुमेह नियंत्रणासाठी वापरल्या जाणाऱ्या औषधांमधील समान घटकांच्या संपर्कात आल्याने विपरीत परिणाम होऊ शकतो.लक्षात घ्या, जास्वंद रक्तातील साखरेच्या पातळीवर देखील परिणाम करू शकतो. त्यामुळे मधुमेह असलेल्या लोकांनी नियमितपणे सेवन केल्यास रक्तातील साखरेचे बारकाईने निरीक्षण करणे आवश्यक आहे. टाईप २ मधुमेह प्रभावीपणे व्यवस्थापित करण्यासाठी विशेषत: आहारातील बदल, नियमित शारीरिक हालचाली आणि आवश्यक असल्यास, औषधोपचार यांचा एकत्रित फंडा वापरायला हवा.

एकंदरीत, हे लक्षात घेणे महत्त्वाचे आहे की जास्वंदाचे आरोग्य फायदे खरे असले तरी, मधुमेहावरील एकमेव उपचार म्हणून त्यावर अवलंबून राहू नये. मधुमेह नियंत्रणातील फायदे आणि जोखीम पूर्णपणे समजून घेण्यासाठी तुमच्या वैद्यकीय स्थितीशी परिचित असलेल्या तज्ज्ञांचा सल्ला आवर्जून घ्या.

# निरोगी राहायचय, असा असावा आरोग्यदायी आहार

आरोग्यतज्ज्ञ, पोषणतज्ज्ञ, आहारतज्ज्ञ आणि वैद्यकीय क्षेत्रात काम करणार्या सर्वच अभ्यासकांकडून सातत्याने सांगूनही भारतीयांच्या आहारामध्ये अतिप्रमाणात मीठ असणारे पदार्थ, अतिप्रमाणात साखर असणारे पदार्थ, पॅकबंद पदार्थ यांचे सेवन वाढत चालले आहे. त्यामुळेच मधुमेह, हृदयविकार, रक्तदाब, कर्करोगासह अन्य अनेक आजार विशी-तिशीतील तरुणांमध्येही दिसून येऊ लागले आहेत.इंडियन कौन्सिल ऑफ मेडिकल रिसर्च अर्थात आयसीएमआरशी संलग्न असलेल्या नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ न्यूट्रिशनने (एनआयएन) एका अभ्यासाद्वारे जाहीर केलेल्या माहितीमुळे सबंध देशाची झोप उडाली आहे. एनआयएनच्या मते, जीवनशैलीशी संबंधित निम्म्याहून अधिक म्हणजे ५६.४ टक्के आजार हे आहारामुळे होतात. ही माहिती देताना आयसीएमआरने खाण्यापिण्याच्या चुकीच्या सवयींमुळं भारतात लठ्ठपणाच्या समस्या वाढत असून याला वेळीच आळा घालणं गरजेचं आहे; अन्यथा भविष्यात मोठ्या समस्या निर्माण होऊ शकतात, असा इशारावजा सल्लाही दिला आहे.यामध्ये एक महत्त्वाची बाब म्हणजे, बाजारात मिळणार्या डबाबंद अन्नपदार्थांवर- खाद्यपदार्थांवर लिहिलेली माहिती दिशाभूल करणारी असू शकते. त्यामुळे त्यांची निवड करताना काळजी घेणे आवश्यक आहे. फळांच्या रसाच्या नावाने विकल्या जाणार्या पेयात फक्त दहा टक्के फळांचे प्रमाण असू शकते, बाकी साखर असू शकते, हे त्यांनी उदाहरण देऊन स्पष्ट केले आहे. इतकेच नव्हे, तर शुगर फ्री म्हणून विकल्या जाणार्या खाद्यपदार्थ किंवा पेयांमध्ये चरबीचे प्रमाण जास्त असू शकते.याखेरीज सध्या ऑरगॅनिक किंवा नैसर्गिक, सेंद्रिय उत्पादनांना मोठी मागणी निर्माण झाल्यामुळे त्याचाही फायदा बाजारातील अनेक उत्पादक घेताना दिसतात. यासाठी आपले उत्पादने अनेकदा सेंद्रिय असल्याचा दावा केला जातो; पण बहुतेकदा अशा उत्पादनांना ऑरगॅनिक इंडियाच्या लोकांकडून मान्यता मिळालेली नसते. नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ न्यूट्रिशनच्या मते, उत्पादनामध्ये एक किंवा दोन नैसर्गिक घटक जोडल्याने ते नैसर्गिक होत नाही. तिसरी महत्त्वाची बाब म्हणजे बॉडीबिल्डिंगसाठी वापरल्या जाणार्या प्रोटिन सप्लिमेंटस्चा वापर हानिकारक असू शकतो, असेही यामध्ये म्हटले आहे.आयसीएमआर आणि एनआयएनने जाहीर केलेली ही माहिती ग्राहक म्हणून आणि नागरिक म्हणून आपल्या सर्वांसाठी महत्त्वाची आहे. बाजारातील पॅकबंद उत्पादने आणून, त्यांचे सेवन करून आपण आरोग्यदायी आहार सेवन करत आहोत, अशा भ्रमात राहणार्यांच्या डोळ्यांत अंजन घालण्याचे काम या अहवालाने केले आहे.

# कधी कधी मैत्री जीवावर बेतते, अपहरण, खंडणी आणि ’ती’चा खून



आजकाल कॉलेज, जॉब आणि व्यावसायाच्या निमित्ताने अनेकदा तरुण-तरुणींमध्ये मैत्री होते. मात्र आपण ज्याला मैत्री मानतो, ती खरेच मैत्री आहे का? याची खोलात जाऊन चौकशी करायला पाहिजे; अन्यथा कधी कधी अशी मैत्री जीवावर बेतते. अशाच एका घातक मैत्रीची ही कथा भाग्यश्री सुडे ही मूळची लातूर जिल्ह्यातील हरंगुळ बुद्रुक गावची. तिच्या कुटुंबातील एकुलती एक मुलगी. वडील गावचे माजी सरपंच, घरची परिस्थिती सधन. अभियांत्रिकीच्या शिक्षणासाठी ती पुण्यात आली होती. एका नामांकित कॉलेजमध्ये चौथ्या वर्षात शिक्षण घेत होती. तर शिवम फुलवळे हा मूळचा नांदेड जिल्ह्यातील मुखेड तालुक्यातील सकनूर गावचा. त्याचे वडीलदेखील शिक्षक. घरची परिस्थिती चांगली. शिवम आणि भाग्यश्री एकाच महाविद्यालयात शिक्षण घेत होते, त्यामुळे दोघांत मैत्री झाली. भेटीगाठी वाढत गेल्या.३० मार्च रोजी शिवम याने भाग्यश्रीला सांगितले की, त्याच्या वाढदिवसाची पार्टी आहे. माझे काही मित्र-मैत्रिणी बरोबर आहेत. आपल्याला बाहेर जायचे आहे. त्यावेळी भाग्यश्री फिनिक्स मॉलमध्ये होती. शिवम कार घेऊन तेथे आला. त्याचे मित्र सागर आणि सुरेश हेसुद्धा कारमध्येच होते. मात्र भाग्यश्रीला माहिती नव्हते की, आजचा दिवस हा आपल्या आयुष्यातील शेवटचा दिवस असून, तिचा मित्र शिवम हाच तिच्यासाठी काळ बनून आला आहे. मित्रावर आंधळा विश्वास ठेवून ती गाडीत बसली.मात्र शिवमच्या डोक्यात एक भलताच कट शिजत होता. त्याला माहीत होते की, भाग्यश्रीचे पालक श्रीमंत आहेत. भाग्यश्रीसाठी ते पाच-दहा लाख रुपये सहज देतील. पैशासाठी सैतान संचारलेल्या शिवमच्या डोक्यात वेगळीच योजना सुरू होती. रात्री आठ वाजताच्या सुमारास गाडी नगरच्या दिशेने धावू लागली. काही अंतर पुढे गेल्यानंतर सागर आणि शिवम या दोघांनी चिकटपट्टीने भाग्यश्रीचे हात-पाय बांधले. त्यानंतर क्षणाचाही विलंब न करता, दोघांनी तिचा गळा आणि तोंड दाबून तिचा खून केला. शिवम आणि त्याच्या मित्रांनी कामरगावच्या परिसरात आधीच एक खड्डाही खणून ठेवला होता. त्या ठिकाणी रात्री दीड वाजताच्या सुमारास ठरलेल्या निर्जनस्थळी तिघांनी भाग्यश्रीचा मृतदेह पेट्रोल टाकून जाळला. त्यानंतर तो खड्ड्यात पुरून नांदेडला पळ काढला.दुसरीकडे, घराबाहेर पडताना भाग्यश्रीनेदेखील आपल्या मैत्रिणीच्या वाढदिवसाला जात असल्याचे आईला सांगितले होते. दुसर्या दिवशी आईने तिला फोन केला तेव्हा तो बंद लागला. तिच्या घरच्यांनी पुण्यातील मित्र-नातेवाईक यांच्याशी संपर्क करून भाग्यश्रीबाबत विचारणा केली, तेव्हा ती बेपत्ता असल्याचे पुढे आले.शिवम याने त्याच्या पूर्वनियोजित योजनेप्रमाणे भाग्यश्रीच्या मोबाईलवरूनच तिच्या घरच्यांकडे खंडणी मागण्यास सुरुवात केली. भाग्यश्रीच्या घरच्यांना धमकीचे मेसेज येऊ लागले, त्यामुळे तिच्या कुटुंबीयांनी विमानतळ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला. भाग्यश्रीच्या मोबाईलवरून खंडणीची मागणी होत असल्यामुळे पोलिस आणि नातेवाइकांनाही थोडा संशय आला. मात्र पोलिसांच्या लक्षात घटनेचे गांभीर्य आले. शिवम याने भाग्यश्रीच्या बँक खात्याचा ॲक्सेस घेण्यासाठी स्वतःचा मोबाईल क्रमांक टाकला आणि येथेच तो जाळ्यात अडकला. पोलिसांनी तांत्रिक विश्लेषणाद्वारे त्याचा ठिकाणा शोधून काढला. त्याला चौकशीसाठी बोलावले, त्यावेळी तो एखाद्या सोज्वळ तरुणासारखा उत्तरे देत होता. त्याने ‘तो मी नव्हेच’ म्हणण्याचा खूप प्रयत्न केला. मात्र छडा लागेपर्यंत थांबतील ते पोलिस कसले. अखेर पोलिसांनी त्याला बाप दाखव नाहीतर श्राद्ध घाल, असे सांगितले. त्याचवेळी त्याने खंडणीसाठी भाग्यश्रीचे अपहरण करून खून केल्याची कबुली दिली. यासाठी त्याने आपल्या दोघा मित्रांची मदत घेतली. पोलिसांनी याप्रकरणी, शिवम माधव फुलवळे (वय २१, रा. ऑक्सी हेवन सोसायटी, वाघोली. मूळ नांदेड), सुरेश शिवाजी इंदोरे (वय २३, रा. मुंबई, मु. सकनूर, नांदेड), सागर रमेश जाधव (वय २३, रा. कासलेवाडी, ता. शिरोळा अनंतपाळ, जि. लातूर) या तिघांना अटक केली. शिवम हा या घटनेतील मुख्य सूत्रधार आहे. पोलिसांच्या चौकशीत तिघांनी भाग्यश्रीचा खंडणीसाठी अपहरण करून खून केल्याचे सांगितले आहे.

# अतिविचार आजारास कारणीभूत



आयुष्यात प्रत्येकाला अनेक प्रकारच्या समस्यांना, अडचणींना तोंड द्यावे लागते. त्या कशा निस्तरायच्या याचा विचारही व्यक्ती करतो. विचार करून काम करणे आणि उपाय शोधणे, ही चांगली गोष्ट आहे. पण दरवेळी अतिविचार करणे हे आरोग्यासाठी नुकसानकारक ठरते. नोकरदार-व्यावसायिकांना ऑफिसमध्ये गेल्यावर प्रत्येकालाच काही समस्या भेडसावतात; पण रोजीरोटीसाठी काम करणे अपरिहार्य असल्याने अनेकांचा नाइलाज असतो. यातील बहुतेक जण ऑफिसमधील तणाव घरी आणतात. पण त्यामुळे वैयक्तिक आयुष्यावर त्याचा नकारात्मक परिणाम होतो. प्रत्येक वेळी त्याच गोष्टींविषयी बोलणे, विचार करणे सुरू राहते. त्यातून फायदा काहीच होत नाही; पण विचारचक्र सातत्याने सुरू राहते. या विचारचक्रातून समस्येचा उपाय मिळण्याऐवजी उलट कार्यक्षमतेवर प्रतिकूल परिणाम होतो. अतिविचार करण्याने नव्या समस्या तयार होतात. कित्येकदा व्यक्ती नैराश्यग्रस्त होतात. नैराश्याची पातळी वाढल्यास व्यक्ती आत्महत्येसारखे पाऊलही उचलू शकते. आपल्याला अतिविचाराचीही सवय लागू नये, यासाठी ऑफिसमधील कटकटी ऑफिसातच सोडून याव्यात किंवा त्यावर उपाय शोधावा. त्याची चर्चा घरी येऊन किंवा खासगी आयुष्यात करू नये.

अतिविचाराने सर्वात मोठे नुकसान होते ते मेंदूचे. कारण मेंदूच्या क्षमतेवर त्याचा अधिक प्रभाव पडतो. मेंदू योग्य प्रकारे काम करू शकत नाही. अतिविचारामुळे मेंदूला पुरेसा आराम मिळत नाही. त्यामुळे निर्णय अक्षमता, स्मरणशक्ती कमजोर होणे, मेंदूचे आजार होण्याचा धोका वाढणे, कार्यक्षमता कमी होणे, झोप न येणे, बेचैनी, चिडचिड, राग येणे यांसारख्या समस्या निर्माण होतात.अतिविचार करणे हे एखाद्या व्यसनासारखेच आहे. काही काळानंतर विचार मनावर राज्य करू लागतात. अशा व्यक्ती अतिकल्पनाविस्तार करत राहतात. त्यामुळेच मेंदू जास्त भटकू देऊ नका. जास्त विचार केल्यास आपल्या शरीरात कॉर्टिसोल हार्मोन्सची वाढ होते. त्यामुळे आरोग्यावर प्रतिकूल परिणाम होतो.

कॅलिफोर्निया विद्यापीठातील संशोधकांच्या मते, अतिविचार किंवा मेंदू शिणणे यामुळे तणाव, चिंता आणि मूड स्विंग यांसारख्या मानसिक समस्या उद्भवतात. त्याचा परिणाम आपल्या पचन संस्थेवरही होऊ शकतो. त्यामुळे पोटात जळजळ होणे, इरिटेबल बोवेल सिन्ड्रोम, गॅस्ट्रिक सिक्रेशनमध्ये बदल, आतड्यांचे कार्य योग्य प्रकारे न होणे आदी समस्या निर्माण होतात. जास्त विचार किंवा चिंता करणे हे हृदयाच्या आरोग्यावरही परिणाम करते. अनेक प्रकारच्या आजारपणांचा धोका वाढवते.

अतिविचारामुळे छातीमध्ये वेदना, चक्कर येणे अशा काही समस्या निर्माण होतात. नैराश्य, व्यसन आणि झोपेशी निगडित समस्या या सतत विचार करण्याच्या सवयीचा परिपाक आहेत. अतिविचार केल्याने चिंता वाढते. चिंतेमुळे भावनात्मक तणावही वाढतो. तसेच सोरायसिस, एटॉपिक डर्मेटायटिस, खूप जास्त खाज येणे, एलोपेशिया एरियाटा आणि सिबोरहिक डर्मेटायटिससारख्या समस्या वाढण्याची शक्यता असते.अतिविचार किंवा सततच्या चिंतेमुळे रोगप्रतिकारक शक्तीही प्रभावित होते. तज्ज्ञांच्या मते, यामुळे मेंदूच्या पेशी कमजोर होतात. यापासून बचाव करायचा असेल, तर नियमित व्यायाम हा व्यग्र दिनचर्येतही समाविष्ट झाला पाहिजे. रोज चालणे, धावणे किंवा योगाभ्यास, पोहणे आदी प्रकारचे व्यायाम केल्याने मेंदू आणि शरीर संतुलित राहते. व्यायाम केल्याने शरीरात तणाव निर्माण करणार्या हार्मोन्सचे प्रमाण कमी होते आणि आनंद देणार्या हार्मोन्सचे प्रमाण अधिक वाढते. अतिविचाराच्या समस्येवर अक्सीर इलाज म्हणजे मेडिटेशन अर्थात ध्यानधारणा. रोजच्या २४ तासांपैकी १५ ते ३० मिनिटे एका जागी शांत बसून, डोळे मिटून आपल्या श्वासांवर लक्ष केंद्रित करा. मनात येणार्या विचारांना रोखू नका. रोज असे केल्यामुळे अतिविचारांच्या समस्येतून मुक्तता मिळू शकते.

# जनतेला करावा लागतो पाणीटंचाईचा सामना, १६ गावात विहिरीचे अधिग्रहण

किनवट. प्रतिनिधी. (शेख शौकत) जिल्ह्यातील सर्वात जास्त क्षेत्रफळ असलेला भौगोलिकदृष्ट्या अतिशय दुर्गम, डोंगर, दरी, खोऱ्यात गावे, वाडी, तांडे वसलेले १९१ गावे असलेला महाराष्ट्राच्या आखरी टोकाला तेलंगाना राज्याच्या सिमेवर असलेल्या किनवट तालुक्यात या वर्षीच्या पाणी टंचाईचा सामना करावा लागत आहे. टंचाईग्रस्त गावामध्ये एकूण १६ विंधन विहीरीचे अधिग्रहन केले आहे. तालुक्याची महाराष्ट्रात डोंगरी, आदिवासी, नक्षल तालुका म्हणून ओळख आहे. तालुक्यात एकूण १९१ गावे व १३४ ग्रांम पंचायत आहेत. डोंगरी भाग जास्त असल्याने तालुक्यात भीषण पाणी टंचाई आहे. किनवट तालुक्याचे सरासरी पर्जन्यमान ८७० मि. मी. असून जिल्ह्यात सर्व तालुक्यापेक्षा जास्त आहे. तालुक्यात लघू व मध्यम (तलाव) प्रकल्प १९ आहेत. व पैनगंगा नदी या तालुक्यातून वहाते या नदीवर जवळपास ७ उच्च पातळीचे बंधारे झाले आहेत. त्यामुळे या नदी तिरावरील गावाची व तलावाच्या आजुबाजूस





असलेल्या गावाच्या जमिनितील वॉटर लेवल वाढलेले असल्यामुळे तेथील विहीरी व बोअरला पाणी असल्यामुळे पाणी टंचाई भासत नाही. यंदा तालुक्यातील काही गावे असे आहेत की त्यांना तलाव किंवा नदी जवळ नाही आशा गावातील लोकांना दर वर्षीच उन्हाळ्यातील मे,महिन्यात पाणी टंचाईचा सामना करावा लागतो. तालुक्यातील १९१ पैकी आशा गावातील पाणी टंचाई असलेल्या ठिकाणची एकूण ३६ इंधन विहिर (बोअर) अधिग्रहणाचे प्रस्ताव पंचायत समिती किनवटकडे आले. त्यापैकी कंचली, कंरजी, इरेगाव, सिंगारवाडी, दिपला नाईक तांडा (२), शिवणी, तोटंबा (२), मार्लागुंडा (२), अमरसिंग नाईक तांडा, गोंडे महागाव, दुर्गानगर, मानसिंग नाईक तांडा येथील एकूण १५ विंधन विहीर (बोअर) व वडोली येथील विहीर असे एकूण १६ ठिकाणचे अधिग्रहणाचे प्रस्ताव पंचायत समिती किनवट यांनी मंजुर केले आहेत. तालुक्यात एकूण २५ विद्युत पंप आहेत. त्यापैकी ११ चालू आहेत. नादुरुस्त ७ व बुजलेले ७ आहेत. तालुक्यात एकूण हातपंप ७८२ आहेत. त्यापैकी ६४७ चालु आहेत. बुजलेले १३५, नादुरुस्त १६ पैकी १२ दुरुस्त केले तर ४ दुरुस्ती करण्याचे बाकी आहेत. तालुक्यात कुठेही पाण्याचे टँकर लावण्याची आज पर्यंत तरी गरज पडली नाही.

## पुर्व भाग कृती समिती कडून दत्ता मस्के यांच्या आठवणीला उजाळा देत अभिवादन वाहण्यात आले

लातूर :--- लातूर शहर पूर्व भागातील सामाजिक कार्यकर्ते मिस्टर नगरसेवक कै दत्ता मस्के यांच्या तृतीय पुण्य स्मरणा निम्मित आज नांदेड रोडवरील दत्ता मस्के चौकात लातूर शहर पूर्व भाग नागरी कृती समितीच्या वतीने आयोजित कार्यक्रमात सर्व पक्षीय नेत्यांकडून दत्ता मस्के यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले या वेळी स्थानिक माजी नगरसेवक मंगेश बिराजदार यांनी आपल्या मनोगतात मित भाषी मनमिळाऊ स्वभावाचे दिवंगत दत्ता मस्के यांनी स्वतःच्या आरोग्यासाची काळजी न घेता कोरोना काळात पूर्व भागातील तळागाळातील नागरिकांच्या संपर्कात राहून आवश्यक सेवे सह आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्याचे पुण्याचे काम केल्याचे मत व्यक्त केले यावेळी माजी नगरसेविका वर्षा मस्के,ग्रामपंचायत सदस्य सौ. रत्नमालाताई घोडके,महिला भाजपा नेत्या सौ.निर्मलाताई



कांबळे,आर्यन सैनेचे अविराजे निबाळकर यांनी दिवंगत दत्ता मस्के यांच्या आठवणीला उजाळा दिला यावेळी लातूर शहर पूर्व भाग नागरी कृती समितीचे अध्यक्ष दीपक गंगणे,संस्थापक सचिव बाबासाहेब बनसोडे,नवनाथ आल्टे,विजयकुमार साबदे,सुनिल बसपुरे,गौतम सुर्यवंशी,लक्ष्मन मस्के,राजाभाऊ गवळी,सचिंद्र कांबळे,अंगद गायकवाड, श्रावन मस्के, तानाजी शिंदे,संजय कदम, विठ्ठल मस्के,शुभम कांबळे, दक्ष मस्के,प्रमेश्वर गायकवाड इत्यादी मोठ्या संख्येने नागरीक उपस्थित होते कार्यक्रमाचे प्रास्ताविक दीपक गंगणे यांनी केले तर सूत्रसंचालन बाबासाहेब बनसोडे यांनी केले तर उपस्थिताचे आभार प्रदर्शन निर्मला ताई कांबळे यांनी मानले

## छगन भुजबळ आजूनही नाराज? गिरीश महाजन यांनी स्पष्टच सांगितलं

नाशिक नाशिकच्या राजकीय वर्तुळात पुन्हा एकदा छगन भुजबळ हे नाराज असल्याची चर्चा सुरु झाली आहे. जयंत पाटील यांनी भुजबळ नाराज असल्याचे विधान केल्यानंतर भाजपचे संकटमोचक असलेले गिरीश महाजन नाशिकला असल्याने तत्काळ भुजबळ फार्मला हजेरी लावत भुजबळांची भेट घेतली.दोन दिवसांनी मतदान आहे, त्याच संदर्भात भुजबळांशी चर्चा झाल्याचे भेटीनंतर माध्यमांशी बोलताना महाजन यांनी सांगितले. दरम्यान भुजबळ हे आजूनही नाराज आहेत यासंदर्भात महाजनांना विचारले असता तसे काहीही नसल्याचे महाजनांनी स्पष्ट केलं आहे.काय म्हणाले महाजन? भुजबळांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या सभेत जोरदार भाषण केलं.मोदींना का पंतप्रधान करायचे आहे, हे त्यांनी अतिशय समर्पक शब्दांत भाषणात मांडले आहे.त्यामुळे भुजबळ नाराज असल्याचे पसरविण्याच्या चर्चा निरर्थक असल्याचे महाजनांनी सांगितले आहे.अनिल देशमुख तरी तिथे स्थिरस्थावर आहेत का? यावेळी बोलताना महाजन यांनी, अजित पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष सुनिल तटकरे यानी शरद पवार यांची मध्यरात्री भेट घेतल्याचे अनिल देशमुख यांनी सांगितले होते. जे सोडून गेले त्यांना परत घेणार नाही, असेही त्यांनी म्हटले. त्यावर बोलताना महाजन यांनी देशमुखांनी तटकरेंची चिंता सोडून द्यावी. यावर गिरीश महाजन म्हणाले की, अनिल देशमुख तरी तिथे स्थिरस्थावर आहेत का? तुम्ही तिकडे राहा नाहीतर अजून काही वेगळे विचार तुमच्या मनात येतील. सुनील तटकरेंची चिंता तुम्ही करू नका, असा टोला त्यांनी यावेळी अनिल देशमुखांना लगावला.भुजबळांनी देखिल याबाबत सांगत तटकरे यांनी माझं कोणाचं बोलणं झाले नाही असे सांगितले आहे. त्यामुळे देशमुख, तुम्ही तुमचं सांभाळा. तुमचे लोक इकडे येणार नाही ते पाहा. त्यांच्यासाठी डिपार्टमेंट राखून ठेवले आहेत, असा टोला भुजबळांनी अनिल देशमुखांना लगावला आहे.

## नांदेड वन विभागामार्फत सहस्त्रकुंड येथे कार्यशाळेचे आयोजन,वन विभागाचे सुधारित कार्य योजना



किनवट.प्रतिनिधी. (शेख शौकत) :नांदेड वन विभागामार्फत इस्लापूर, बोधडी, अप्पारापेठ या तिन वनपरिक्षेत्र कार्यालयाच्या कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी सहस्त्रकुंड येथे निसर्गरम्य नर्सरीमध्ये कार्यशाळेचे आयोजन दिनांक १५ रोजी नांदेड येथील उपवनसंरक्षक केशव वाबळे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. या कार्यशाळेमध्ये नांदेड वन विभागाची सुधारित कार्य योजना तयार करणे कामी वन कक्षाचे साठा चित्रण नकाशे तयार करण्यासंदर्भात प्रशिक्षण देण्यात आले. पुढील दहा वर्षाच्या कालखंडामध्ये मिश्र प्रजाती मुख्य प्रजाती सागवान जंगल विदेशी प्रजाती नैसर्गिक बांबू ,कक्षातील खडकाळ भाग वनीकरणास योग्य छत्र, संवर्धन ,वन्यप्राणी दळी प्लांट, अकाष्ट मनोपच या बाबी संदर्भात कार्य आयोजन शाळा विभाग संभाजीनगरचे राहुल मराठे वनक्षेत्र अधिकारी यांनी या कार्यशाळेसाठी हजर असलेल्या वनपाल व ७० वन कर्मचाऱ्यांना वरील बाबी संदर्भात व पुढील दहा वर्षाच्या कालावधीच्या आराखड्यासंदर्भात सविस्तर मार्गदर्शन केले. या कार्यशाळेसाठी यश काळे प्रशिक्षणार्थी उपवनसंरक्षक नांदेड सहाय्यक वनसंरक्षक गिरी वनक्षेत्रपाल सचिन धनगे, इस्लापूर, वनक्षेत्रपाल आप्पारावपेठ एस.डी. ढगे, वनक्षेत्रपाल मोहन कोसकेवार, वनपाल इस्लापूर व्ही एस गुद्दे , अप्पाराव पेठ वनपाल बि.टी जाधव, श्रीराम सज्ञन, निलपत्रे वार वनपाल बोधडी, यांच्यासह ७० महिला व पुरुष कर्मचाऱ्यांची प्रामुख्याने या शिबिरास उपस्थिती होती. सदरील शिबिराचे व्यवस्थापन व्यवस्थित पार पाडण्यासाठी इस्लापूर येथील वनरक्षक अकबर सैयद व इस्लापूर वन कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

## विज्ञान व अध्यात्माच्या समन्वयातून विश्वशांती निर्माण होण्याचा संदेश जगभर पोहचविला- विश्वशांतीदूत प्रा. डॉ. विश्वनाथ कराड

लातूर : – भारतीय तत्वज्ञान हे त्याग, भक्ती, आपुलकी आणि सदभावना यावर आधारित आहे. परंतु दुर्दैवाने जगभरात उच्च प्रगत शैक्षणिक प्रणालीमुळे या पैलूला बगल दिली गेली आहे. ११ सप्टेंबर १८९३ रोजी जागतिक धर्म संसदेत भारताचे महान पुत्र स्वामी विवेकानंद यांनी बोललेले भविष्यसूचक शब्द केवळ विज्ञान आणि धर्म/अध्यात्म यांचे एकत्रिकरणच मानवजातीत सुसंवाद आणून शांती निर्माण करेल असे प्रतिपादन एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हिर्सिटीचे संस्थापक अध्यक्ष व युनेस्को अध्यासनाचे प्रमुख विश्वशांतीदूत प्रा. डॉ. विश्वनाथजी कराड यांनी केले. तत्वज्ञ संत श्री. ज्ञानेश्वर महाराज व तत्वज्ञ संत श्री. तुकाराम महाराज यांचे तत्वज्ञान, युगपुरूष स्वामी विवेकानंद यांच्या विज्ञान आणि अध्यात्माच्या समन्वयाचा व विश्वशांतीचा संदेश यशस्वीरित्या जगभर पोहचवून एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हिर्सिटीचे संस्थापक अध्यक्ष व युनेस्को अध्यासनाचे प्रमुख विश्वशांतीदूत प्रा. डॉ. विश्वनाथ दा. कराड यांच्या नेतृत्वातील शिष्टमंडळ यूके आणि अमेरिका या देशाचा यशस्वी दौरा पुर्ण करुन नुकतेच मायदेशी परतले. अमेरिकेतील, उटाह राज्यातील ब्रिगहॅम यंग युनिव्हर्सिटीतर्फे (बीवाययू) शिक्षण आणि मानवतेच्या दीर्घकाळ समर्पित सेवेसाठी प्रा. डॉ. विश्वनाथ दा. कराड यांना मानद डी.लिट. पदवी प्रदान करून सन्मानित करण्यात आले आहे. या शिष्टमंडळात एमआयटी डब्ल्यूपीयूचे कार्यकारी अध्यक्ष प्रा. राहुल वि. कराड, कुलगुरू डॉ. आर.एम.चिटणीस, प्र कुलगुरू डॉ. मिलिंद पांडे, नागपूर विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. एस.एन.पठाण, डॉ. महेश थोरवे व अधिष्ठाता प्रा. मिलिंद पात्रे उपस्थित होते. दरवर्षी प्रमाणे याही वर्षी लातूर तालुक्यातील मौजे रामेश्वर येथील संत श्री. गोपाळबुवा महाराज मंदिर परिसरात होत असलेल्या अखंड हरीनाम सप्ताह सोहळ्यात सहभागी होण्यासाठी विश्वशांतीदूत प्रा. डॉ. विश्वनाथजी कराड आले असता शुक्रवारी दुपारी काल्याच्या किर्तनानंतर पत्रकारांशी संवाद साधताना वरील प्रतिपादन केले. यावेळी हभप तुळशीराम कराड, काशीराम कराड व एमआयटी एडिटी युनिव्हर्सिटीचे कार्याध्यक्ष प्रा. डॉ. मंगेश कराड उपस्थित होते. यावेळी पत्रकारांशी बोलताना प्रा.डॉ.विश्वनाथ दा.



कराड म्हणाले, शिक्षणात वैश्विक मूल्याधिष्ठीत शिक्षणाचा अंतर्भाव करणे गरजेचे आहे. त्यातूनच वसुधैव कुटुम्बकम आणि विश्व बंधुत्वाचे वातावरण निर्माण होण्यास मदत होईल. मन, बुद्धी, आत्मा आणि शरीर हे निसर्ग तत्व आहे. आज शरीर आणि बुद्धी यावर सखोल संशोधन होत आहे. परंतू आत्मा आणि मनाच्या शिक्षणाचा विचार झालेला दिसत नाही. जगात शांती नांदायची असेल तर अध्यात्माबरोबरच मन आणि आत्म्याचा अभ्यास होणे गरजेचे आहे. जगात शांती नांदायची असेल तर अध्यात्माबरोबरच मन आणि आत्माचा अभ्यास होणे गरजचे आहे. तसेच मनाचे रसायनशास्त्र आजपर्यंत कोणालाही कळलेले नाही. त्यासाठी आजच्या शिक्षण पद्धतीमध्ये मनाच्या शास्त्राचा समावेश करावा. असे सांगून प्रा. डॉ. विश्वनाथजी कराड यांनी लंडन येथील ऑक्सफोर्डमध्ये आयोजित 'मूल्याधिष्ठित शिक्षण पद्धती' यावरील गोलमेज परिषदेत आज जगामध्ये दहशतवाद, घातपात, रक्तपात, जातीय व धर्मवादामुळे अशांतता व भितीचे वातावरण निर्माण झाले आहे. हे कमी करण्यासाठी शिक्षण पद्धतीत वैश्विक मूल्याधिष्ठीत शिक्षण पद्धतीचा अवलंब करणे गरजेचे आहे. त्यातुनच विश्वशांतीचे वातावरण निर्माण होण्यास मदत होईल असे बोलून दाखविले. अमेरिकेतील ऑर्ट इन्स्टीट्यूट ऑफ शिकागो येथील फुलरटन हॉल ज्या ठिकाणी स्वामी विवेकानंद यांनी ११ सप्टेंबर १८९३ रोजी जागतिक धर्म संसदेदरम्यान जे ऐतिहासिक भाषण केले त्या ठिकाणी विश्वधर्मी प्रा.डॉ. कराड यांनी भारताचे थोर सुपुत्र स्वामी विवेकानंद यांचा पुतळा बसविण्याचा संकल्प घेतला. गोलमेज या परिषदेमध्ये वॉर्विक येथील लॉर्ड टेलर, थोर शिक्षणतज्ञ डॉ. नील हॉक्स, लंडन येथील तथागत गौतम बुद्ध डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा प्रचार व प्रसार करणारे विचारवंत डॉ. गौतम चक्रवर्ती, लंडन स्थित इंडियन हाय कमिशनच्या डॉ. निधी चौधरी, केंब्रिज विद्यापीठाचे ज्येष्ठ प्राध्यापक डॉ. ब्रायन फोर्ड, स्वित्झरलँड येथील डॉ. जेफ्री क्लमेंटस हे सहभागी झाले होते. ब्रिगहॅम यंग युनिव्हर्सिटीतर्फे (बीवाययू) शिक्षण आणि मानवतेच्या दीर्घकाळ समर्पित सेवेसाठी प्रा. डॉ. विश्वनाथ दा. कराड यांना देण्यात आलेल्या मानद डी. लिट. पदवी प्रदान समारंभास विविध देशातील २५ हजाराहून अधिक नागरीक उपस्थित होते अशी माहिती देण्यात आली.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE